<u>नि.दि.मु.क्र. ६९/२०१४ मधील नि.क्र. ३५ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा दावा वादग्रस्त मिळकतीचे वाटप होवून त्यातील हिश्श्यांचा कब्जा मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज वादीने वादपत्रात दुरुस्ती आणण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे क्रम ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे. अर्जातील वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाव्याच्या विरोधात प्रस्तुतकामी कैफियत दाखल केलेली असून; चतु:सिमापुर्वक दोन गुंठा जमिनीचे क्षेत्र खरेदीखताने खरेदी केल्याचे नमूद केलेले आहे. वादीचे पुर्वाधिकारी यांचा वादीच्या मिळकतीत १० आणे हिस्सा असताना महसुल दप्तरी चार आणे हिस्सा नमूद केलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांचा १२ आणे हिस्सा महसूल दप्तरी नमूद करण्याचे झाले कारणाने दावा लिहिताना तसा उल्लेख दाव्यात करण्याचे अनावधानाने व नजरचुकीने झालेले आहे. दाव्यात उणीव राहू नये म्हणून वादीस प्रस्तुतकामी वादपत्रातील परि.क्र. २ मधील पहिली ओळ 'सदरची दावा मिळकतीपैकी चार आणे हिश्श्याचे जमिनीचे क्षेत्र हे' असे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच याच परिच्छेदमधील पाचव्या ओळीत 'वादी याची नावे महसुल दप्तरी चार आणे हिश्श्यास दाखल झालेली आहेत. महसूल दप्तरातील चुकीमुळे दावा मिळकतीच्या अधिकार अभिलेखात वादीचा चार आणे हिस्सा दाखविण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात वादीचा दावा मिळकतीत १० आणे हिस्सा आहे. त्यामुळे चार आणे हिश्श्याऐवजी १० आणे असा शब्दप्रयोग करण्यास व तद्अनुषंगाने दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी. सबब दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन वादीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. २ याने नि.क्र. ३६ वर सदर अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला आहे. सदर प्रतिवादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्ज खोटा व खोडसाळ असून; तो कायदेशीर नाही. नि.क्र. २४ वर वादीने याच आशयाचा अर्ज दुरुस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केलेला होता व तो दि. २७/०८/२०१५ रोजी फेटाळण्यात आलेला आहे. तथाकथित मिळकतीतील १० आणे हिश्श्यांबाबत वादीने प्रथमदर्शनी पुरावा दिलेला नाही. वादीने दाखल केलेली कागदपत्रे म्हणजेच फेरफार हे सार्वजनिक दस्तऐवज असून; वादग्रस्त मिळकतीतील १० आणे हिश्श्याचा मालकी

हक्क त्यावरुन त्यास प्राप्त होणार नाही. सदरील फेरफार उताऱ्यावरुन वाद मिळकतीत वादीस हक्क किंवा हिस्सा असल्याचे दिसून येत नाही. दुरुस्ती अर्जात वादी जसे नमूद करतो तशी वस्तुस्थिती नाही. त्यामुळे अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या वादग्रस्त मिळकतीतील कायदेशीर हक्कास बाधा निर्माण होवून पैशाच्या स्वरुपात कधीही भरुन न येणारे त्यांचे अपरिमित असे नुकसान होणाारे आहे तसेच वादग्रस्त मिळकतीतील सदर प्रतिवादींना बेदखल व्हावे लागणार आहे. सबब अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा व वादीकडून रु. २०००/— रक्कम प्रतिवादीस देण्यात यावी. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती प्रस्तुत प्रतिवादी क्र. २ याने केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचाराधीन उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष सबळ कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित दुरुस्ती दाव्याचे खरेखुरे वादप्रश्न अंतिमत: निकाली काढण्याकरीता आवश्यक आहे काय? | नाही. |
| २ | प्रस्तावित दुरुस्तीमुळे विरुध्द पक्षकारांचे काही नुकसान होणार आहे काय? | होय. |
| ३ | अंतिम आदेश कोणता? | अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ व २ करीता :—**

०५. सदरील मुद्दे न्यायाच्या दृष्टिकोनातून एकत्रीतपणे विवेचनासाठी घेण्यात आले आहेत. उभयपक्षकारांतर्फे संपुर्ण युक्तिवाद ऐकला.

०६. दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १७ या तरतुदीअन्वये असे

प्रमाणित करण्यात आले आहे की, न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोन्हीपैकी कोणत्याही पक्षकारास, त्यांच्या वादकथनास, न्याय्य असेल अशारितीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. परंतु न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेऊनसुध्दा न्यायचौकशी सुरु होण्यापुर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०७. दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १७ या तरतूदीनुसार, जर प्रस्तावित सुधारणेमुळे विरुध्द बाजूस अन्याय होणार नसेल व दाव्यातील खरे प्रश्न अंतिमत: निकाली काढण्याकरीता प्रस्तावित सुधारणा अभिलेखावर असणे आवश्यक असेल तर अशा दुरुस्तीस परवानगी देणे गरजेचे असते. केवळ उशिर झाला म्हणून दावा दुरुस्तीचा अर्ज न्यायालयास फेटाळता येणार नाही. तसेच नवे वादकारण समाविष्ट करणेकरीता सदर तरतूदीनुसार वादीस प्रस्तावित दुरुस्ती करण्याची मंजूरी देता येणार नाही.

०८. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की नि.क्र. २४ वरील अर्ज वादीने यापूर्वी दाव्यास याचप्रकारची दुरुस्ती होवून मिळणेसाठी दाखल केलेला होता. नि.क्र. २४ व प्रस्तुत अर्जातील प्रस्तावित दुरुस्तीतील कथने एकच असल्याचे दिसून येते. सदरील अर्ज माझे पुर्वाधिकाऱ्यांनी दि. २७/०८/२०१५ रोजी विरुध्द पक्षकारांचे म्हणणे घेवून उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकून गुणवत्तेवर नामंजूर केलेला असल्याचे दिसून येते. त्या आदेशाविरुध्द वादीने मान. उच्च न्यायालय मुंबई यांच्यासमोर अपील दाखल केले असल्याचे दिसून येत नाही. माझे पुर्वाधिकाऱ्यांनी नि.क्र. २४ वरील अर्ज अंतिमत: निकाली करत असताना वादग्रस्त मिळकतीत १० आणे हिस्सा आहे ही बाब वादीने न्यायालयाला भविष्यात पटवून दिली तर त्यासंबंधी फेरदुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यास मुभा राहील असा निष्कर्ष नोंदविला असल्याचे दिसून येत आहे. वादीने

त्या पुष्ठयर्थ नि.क्र. ३२ ते ३४ वरील कागदपत्रांचा आधार घेतलेला आहे. नि.क्र. ३२ वरील फेरफार क्र. १००४ या उताऱ्याचे अवलोकन केले असता; त्यामध्ये राजाराम गोविंद चव्हाण व गोविंद दाजी चव्हाण यांच्या वहिवाटीस आलेल्या मिळकती संदर्भात सदरील फेरफार मंजूर झाला असल्याचे दिसून येत आहे. तसेच; प्रस्तुत अर्जाच्या अंतिम निर्गतीच्याकामी नि.क्र. ३३ व नि.क्र. ३४ वरील फेरफार उताऱ्यांचे अवलोकन केले.

०९. वादीने नि.क्र. २४ वरील माझे पुर्वाधिकाऱ्यांनी अंतिम आदेशामध्ये निष्कर्ष नोंदविल्याप्रमाणे १० आणे हिस्सा असल्यासंबंधीचा ठोस प्रथमदर्शनी कागदोपत्री पुरावा दाखल केला असल्याचे कोठेही दिसून आलेले नाही. माझ्या मते दि. २७/०८/२०१५ रोजीचा माझ्या पुर्वाधिकाऱ्यांनी नि.क्र. २४ वर गुणवत्तेवर पारीत केलेल्या आदेशाविरुध्द वादीने मान. उच्च न्यायालय मुंबई येथे दाद मागणे जरुरीचे होते. नि.क्र. २४ वर प्रस्तुत अर्जातील प्रस्तावित दुरुस्तीतील कथने ही एकच व सारख्या स्वरुपाची असलेने आणि वादीने ठोस सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा देखील दिलेला नसल्याकारणाने वादीची दावा दुरुस्तीची मागणी मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. अर्ज मंजूर करण्याने वादीपेक्षा प्रतिवादींचेच जास्त असे नुकसान होणार आहे. नि.क्र. २४ वरील अर्ज यापुर्वीच अंतिमत: निकाली करण्यात आला असल्याने पुन्हा त्याच मुद्दयावर वादीस दावा दुरुस्तीची मागणी न्यायालयाकडे करता येणार नाही असे माझे न्यायिक मत आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा लागेल. करीता वरील संपूर्ण विवेचनावरुन मुद्दा क्र. १ याचा निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविण्यात येवून, मुद्दा क्र. २ याचा निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदविण्यात येत आहे. करीता मुददा क्र. ३ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

## **आदेश**

अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :— ०७ ऑगस्ट, २०१७ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.